‘माझं एक स्वप्न आहे’

# मार्टिन ल्युथर किंग यांची गोष्ट

नील टोंज

चित्रे व सजावट: ॲलिसन ॲस्टिल

अनुवाद: सुजाता गोडबोले



# ‘माझं एक स्वप्न आहे’

## मार्टिन ल्युथर किंग यांची गोष्ट




नील टोंज

चित्रे व सजावट: ॲलिसन ॲस्टिल

अनुवाद: सुजाता गोडबोले

# प्रकरण १



मार्टिन ल्युथर किंग यांनी आपल्या हॉटेलच्या खोलीच्या खिडकीचा पडदा एका बाजूला केला. आपल्या थकलेल्या डोळ्यांवरून त्यांनी हात फिरवला. किती भाषणे. किती बैठका. गोऱ्या लोकांचे काळ्या लोकांसंबंधीचे मत बदलण्याचा प्रयत्न करणे हे अतिशय कठीण काम त्यांनी अंगावर घेतले होते.

आपल्याच विचारांत गढून गेले असताना अचानक रस्त्यावरून पळत जाणाऱ्या एका काळ्या मुलाकडे त्यांचे लक्ष गेले. त्याच्या गालावरून अश्रू ओघळत होते. अतीव वेदनेने आणि दु:खाने ओरडत असल्याप्रमाणे त्याचे तोंड उघडे होते. रस्त्याच्या कडेला पोचल्यावर तो खाली बसला अन त्याने आपला चेहरा हातात लपवला.





काय बरे झाले असेल? मार्टिनच्या मनात विचार आला. खोलीतून घाईने निघून खाली येऊन लगेच ते त्या मुलाकडे गेले.

“बाळ, काय झालं?”

बेनने आपल्या अश्रूतून वर पहिले तेव्हा एक सुदृढ काळे गृहस्थ त्याच्या शेजारी उभे होते. त्यांचा आवाज धीरगंभीर होता पण त्यात कणव आणि आस्था होती.

सुरुवात कुठून करावी हे बेनला समजेना. त्याच्या तोंडून शब्द कसेबसे बाहेर पडू लागले.



“आधी आमची मैत्री होती. मग ते मला ‘काळ्या’ म्हणू लागले. ते म्हणाले की ते गोरे होते म्हणून ते माझ्यापेक्षा श्रेष्ठ होते. मग आमची झटापट झाली आणि आता आम्ही मित्र नाही.”

“शांत हो बाळ. हे घे. आधी डोळे पूस.”

मार्टिननी त्याला एक मोठा हातरुमाल दिला.

त्यांची फारा दिवसांची दोस्ती असल्याप्रमाणे मार्टिन रस्त्यावर त्याच्या शेजारी बसले. “तुझं नाव काय?” मार्टिननी विचारले.



“बेन. बेन टेलर मॉर्गन.”

“बेन, खूप वर्षांपूर्वी तुझ्यासारखाच एक लहान मुलगा मला माहित होता. त्याचं नाव होतं मार्टिन. आणि त्याच्याही तुझ्यासारख्याच झटापटी व्हायच्या.”

बेन रडायचा थांबला आणि मार्टिन ल्युथर किंग यांच्याकडे धीटपणे पाहू लागला.

"त्याला चांगली मारामारी करता यायची का?" त्याने विचारले.

"सुरुवातीला बरीच मारामारी करायचा आणि तुझ्यासारखाच मार खाऊन यायचा. मग त्याच्या लक्षात आले की मारामारी केल्याने खूप लोकांना दुखापत होते. म्हणून त्याने चांगले बोलायला सुरुवात केली." मार्टिनने त्याला समजावले.

बेनला आता आणखी माहिती हवी होती. "मला त्याच्याविषयी सांगा ना," तो म्हणाला.





# प्रकरण २



आपला रंग काळा आहे म्हणजे आपण निराळे आहोत हे मार्टिनला तो सहा वर्षांचा असतानाच समजले. तो त्याचा शाळेतील पहिलाच दिवस होता आणि मित्रांना त्याबद्दल सांगण्यासाठी तो अधीर झाला होता. त्याचे मित्र गोरे होते आणि ते देखील नुकतेच शाळेत जाऊ लागले होते.

तो शाळेतून घरी आला तेव्हा त्याच्या आईने त्याला थांबवले आणि ती म्हणाली, "बाळ, जरा थांब. कदाचित यापुढे त्यांना तुझ्याशी खेळायचे नसेल."



हे ऐकून मार्टिन कोड्यात पडला. त्याची आई पुढे म्हणाली, “इतके दिवस तुमची मैत्री होती… पण आता… एक पक्के लक्षात ठेव की तू देखील एखाद्या गोऱ्या माणसाइतकाच चांगला आहेस.” मार्टिनला याचा अर्थ फारसा समजला नाही, पण आईचे म्हणणे त्याने चांगले लक्षात ठेवले.

अपेक्षेप्रमाणेच, त्याच्या गोऱ्या मित्रांपासून तो वेगळा राहू लागला. गोऱ्या आणि काळ्या लोकांना वेगळी वागणूक मिळते हे लवकरच मार्टिनच्या लक्षात आले. आठ वर्षांचा असताना एकदा त्याचे वडील त्याला बूट घेण्यासाठी दुकानात घेऊन गेले. दुकानातील एक गोरा विक्रेता त्यांच्याकडे आला.





त्याचा मदतनीस म्हणाला, “तुम्ही जर दुकानाच्या मागच्या भागात येऊन बसलात, तर मी तुम्हाला आनंदाने बूट दाखवेन.” त्याच्या वडिलांनी थेट त्या विक्रेत्याकडे पाहिले आणि ते म्हणाले, “आम्हाला जर इथे बूट दाखवणार नसाल, तर आम्हाला बूट दाखवूच नका.” असे म्हणून मार्टिन आणि त्याचे वडील दुकानातून सरळ बाहेर पडले.



मार्टिनला अखेर बूट मिळाले पण ज्या दुकानात त्यांना मानाने वागवले गेले तेथूनच. तेच तर खरे महत्त्वाचे आहे - लोकांशी आदराने वागणे. त्याकाळी अनेक गोरे लोक तसे वागत नसत.



# प्रकरण ३



भांडण करण्याने केवळ दु:ख वाढत जाते असे मार्टिन मोठा होत असताना त्याच्या लक्षात आले. कोणतीही समस्या असली, तरी त्यावर चर्चेतून मार्ग काढणे अधिक श्रेयस्कर होते असे त्याचे मत झाले. वयाच्या १५ व्या वर्षी तो कॉलेजमध्ये गेला आणि चांगली भाषणे करू लागला.

एका रात्री मार्टिन आणि त्याचे कॉलेजमधील मित्र बसने परत येत असताना बसच्या चालकाने त्यांना उभे असलेल्या काही गोऱ्या प्रवाशांना जागा द्यायला फर्मावले. "चला उठा. आधी उभे रहा!" चालक त्यांच्यावर ओरडला. मार्टिनला ते आवडले नाही, पण त्याने ते मुकाट्याने ऐकले.



कॉलेजच्या सुटीत तो नोकरी करत असे. त्याच्या लक्षात आले की एकाच कामासाठी गोऱ्यांना काळ्या लोकांपेक्षा अधिक पगार मिळत असे.





कॉलेजमधून बाहेर पडल्यावर नेमके काय करावे हे मार्टिनला सुचत नव्हते. मग एक दिवस डॉ. बेंजामिन मेज या कॉलेजच्या प्राचार्यांचे भाषण त्याने ऐकले. अमेरिकेच्या दक्षिणेकडील राज्यांमधील वंशभेदाची वर्तणूक व विचार बदलणे गरजेचे असल्याविषयी ते बोलत होते. त्यांच्या भाषणाने मार्टिन हेलावून गेला. या विषयांवरील प्रवचनाद्वारे गोरे आणि काळे लोक जवळ येऊ शकतील असे त्याला वाटले. आणि त्याचा निर्णय झाला.



१९५४ साली अलाबामा राज्यातील मोन्टगोमेरी येथील बॅप्टिस्ट चर्चमध्ये मार्टिन धर्मोपदेशक झाले. वंशभेदाच्या विचारांपासून आणि काळ्या लोकांना वेगळी वागणूक देण्यापासून गोऱ्या लोकांना परावृत्त करण्याचा त्यांनी निश्चय केला. आणि हे सर्व त्यांनी आपल्या भाषणांतून आणि प्रवचनांतून करायचे ठरवले.

त्यानंतर १ डिसेंबर १९५५ रोजी त्यांचे आयुष्य कायमचे बदलले.



# प्रकरण ४



एका वयस्कर बाईंनी मार्टिन च्या आयुष्याला ही नवी दिशा दिली होती. त्या जरी वयस्कर असल्या तरी भेदभाव चालवून घेणार नाही असा त्यांचा निश्चय होता. रोझा पार्क हे त्यांचे नाव. मोन्टगोमेरीत एका बसचालकाने त्यांना त्यांची जागा एका गोऱ्या प्रवाशासाठी खाली करून देण्यास फर्मावले होते. त्यांनी नम्रतेने पण ठामपणे त्यास नकार दिला आणि जागेवरून हलल्या नाहीत. यापूर्वी काही वेळा आपल्या हक्कांबाबत ठाम असणाऱ्या काही काळ्या लोकांना ठार करण्यात आले होते. बसचालकाला आणखी गोंधळ नको होता म्हणून त्याने पोलिसांना बोलावले आणि बिचाऱ्या रोझाला अटक करण्यात आली.



त्या काळात गोऱ्या व काळ्या लोकांसाठी उपहारगृहात बसण्याची वेगळी व्यवस्था असे, उद्यानात स्वतंत्र बाके, इतकेच नव्हे तर स्वच्छतागृहे देखील वेगळी असत. बसमधील इतर काळ्या लोकांनी काहीच केले नाही. त्यांना बहुधा अशा भेदभावाची सवय झाली असणार किंवा ते घाबरले असणार.





मग रोझाला अटक झाल्याची बातमी काळ्या समाजात वणव्यासारखी पसरली. बऱ्याच काळ्या लोकांना आता हा भेदभाव सहन करायचा नव्हता आणि अनेक गोऱ्या लोकांनी- विशेषतः उत्तरेकडील राज्यांतील - त्यांना पाठिंबा दिला. अर्कान्सा राज्याच्या दक्षिणेकडील लिट्ल रॉक नावाच्या गावातील एका मोठ्या आंदोलनानंतर सरकारने नुकताच शाळांमध्ये भेदभाव - गोऱ्या व काळ्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा - करण्यास मनाई केली होती.

मोन्टगोमेरीत असे आंदोलन केल्यास त्याने देशातील बदलांना चालना मिळेल अशी अनेक आंदोलनकर्त्यांची भावना होती. मार्टिन यांना त्या आंदोलनाचे नेतृत्व करण्याची विनंती करण्यात आली. सुरुवातीला ते याबाबत साशंक होते. ते धर्मोपदेशक म्हणून नुकतेच मोन्टगोमेरीत आले होते आणि चर्चच्या कामाला प्राधान्य द्यायला हवे असे त्यांचे मत होते. शिवाय, काळे लोक हे आंदोलन अनेक महिने चालवू शकतील का याबद्दलही त्यांना खात्री वाटत नव्हती. अखेर रेव्हरंड अबेर्नाथी यांनी या आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी त्यांचे मन वळवले. पुढे त्यांची घनिष्ट मैत्री झाली.



# प्रकरण ५



प्रथम मार्टिन यांनी बस कंपनीला धडा शिकवायचे ठरवले. काळ्या लोकांनी बस वापरू नये अशा अर्थाची ४०,००० पत्रके त्यांनी वाटली. याला म्हणतात 'बहिष्कार'. काळ्या लोकांनी आपल्या गाडीतून इतर काळ्या लोकांना घेऊन जावे यासाठी त्यांचे मन वळवण्यात आले आणि काळ्या टॅक्सीचालकांनी त्यांना बस प्रवासाइतकेच दर लावण्याचे मान्य केले.

याचा उपयोग होत असावा असे दिसले. बहिष्काराच्या पहिल्या दिवशी मार्टिन यांनी शहरातून फेरफटका मारला तेव्हा केवळ हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच काळे लोक बसमधून प्रवास करत होते.



त्या दिवशी संध्याकाळी त्यांनी ४००० लोकांसमोर एक भाषण दिले. ते म्हणाले:

"आम्हाला या भेदभावाचा कंटाळा आला आहे. आमच्याशी कोणी कसेही वागावे याचाही कंटाळा आला आहे... त्यामुळे आता विरोध करण्यावाचून दुसरा पर्याय राहिलेला नाही. इतके दिवस आम्ही खूप संयम बाळगला. पण आज आम्ही इथे स्वातंत्र्य आणि न्याय मिळवण्यासाठी आलो आहोत."

काळ्या लोकांना दुय्यम दर्जा दिला जाऊ नये यासाठी हे आंदोलन यशस्वी होईपर्यंत हा लढा चालू ठेवण्याचे या सभेत ठरवण्यात आले.



# प्रकरण ६



अखेर रोझा पार्क यांना १० डॉलर दंड करून सोडून देण्यात आले. परंतु काही गोऱ्या लोकांचा या सर्व प्रकारास किती विरोध होता हे समजल्यावर मार्टिन यांना धक्काच बसला. त्यांना पत्रातून आणि फोनद्वारे जीवे मारण्याच्या धमक्या येऊ लागल्या. त्यांच्या जिवाला असलेला धोका पाहून त्यांच्या वडिलांनी आणि इतर मित्रांनी त्यांना हे काम सोडून देण्यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला.

मनातून जरी भीती वाटत असली, तरी या आंदोलनाचे नेतृत्व करणे हे आपले कर्तव्य आहे असे त्यांच्या मनाने ठरवले होते. एका रात्री त्यांच्या घरावर बॉम्ब टाकण्यात आला. मार्टिन त्यावेळी घरी नव्हते पण त्यांची पत्नी कोरेटा आणि लहानगी मुलगी सुदैवानेच यातून बचावल्या



आणि तरीही मार्टिन नेहमीच हल्लेखोरांना क्षमा करण्याच्या मताचे होते कारण लोकांचे विचार आणि मते हिंसाचाराने बदलता येत नाहीत असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या आंदोलनाची माहिती जशी पसरत गेली तसे जगातील अनेक लोक त्यांच्या आंदोलनाला मदत करू लागले. पैशाचा ओघ सुरू झाला. पण हिवाळा सुरु झाला की बहिष्कार संपेल आणि आपले लोक परत बसचा वापर सुरु करतील अशी त्यांना भीती वाटत होती.





हा बहिष्कार कायद्याच्या विरुद्ध आहे असे म्हणून बस कंपनीने मार्टिन यांच्यावर खटला दाखल केला. तो जेव्हा न्यायालयात सुनावणीसाठी आला, तेव्हा जणू बहिष्कार संपला असेच दिसू लागले होते. मार्टिन न्यायालयात बसले असताना एका वार्ताहराने त्यांना एक चिठ्ठी आणून दिली. त्यात लिहिले होते की गोऱ्या लोकांनी बसमध्ये वंशभेद करणे हे कायद्याविरुद्ध होते असे अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले होते. मार्टिन यांचा विजय झाला होता.



न्यायालयाबाहेर जमलेल्या वार्ताहरांशी बोलताना मार्टिन म्हणाले, “अमेरिकेत स्वातंत्र्य आणि न्याय यांचा विजय होण्यासाठीचा लढा मोन्टगोमेरीत व्हावा असे परमेश्वरानेच ठरवले असणार.”

एक म्हाताऱ्या काळ्या बाई उत्स्फूर्तपणे म्हणाल्या, “इतके दिवस माझा आत्मा थकला होता पण पायात ताकद होती. आता माझे पाय थकले आहेत पण माझा आत्मा तृप्त झाला आहे.”



# प्रकरण ७



आता जगभरातील लोक मार्टिन यांना ओळखत होते. शांततामय मोर्चे, धरणे आंदोलने आणि स्वातंत्र्यगीते यामागील त्यांची कल्पना लोक सर्वत्र वापरू लागले होते. लॉस एंजेलिस मध्ये त्यांचे भाषण ऐकण्यासाठी २५,००० लोक जमले होते, तर शिकागोत १०,००० लोकांनी त्यांचे भाषण ऐकले. डेट्रॉईट या गावी त्यांच्या नेतृत्वाखालील 'स्वातंत्र्य मोर्चात' ४०,००० लोक सहभागी झाले होते हे एक आश्चर्य मानले जाते



"मार्टिन," अचानक कोणीतरी हाक मारली, "आपल्याला आता निघायला हवे," हॉटेलच्या गॅलरीतून आवाज आला.

"मला आता जायला हवे, बेन. तुझ्याशी बोलून बरे वाटले. स्वतःवर विश्वास ठेव, पण भांडणाने समस्या कधी सुटत नाही हे विसरू नकोस."



मार्टिन हसले आणि त्यांच्या ज्या मित्राने हाक मारली होती त्याच्याकडे जाऊ लागले. बेन रस्त्यावरून उठला आणि पाठमोऱ्या मार्टिनकडे पाहू लागला.



गंमतच आहे, त्याच्या मनात विचार आला, त्यांचे नावही मार्टिन होते! आणि हा विचार मनात घोळवत तो घराकडे निघाला.

“बेन, इतका वेळ कुठे होतास?” बेनचे वडील कमरेवर हात ठेऊन उभे होते आणि ते रागावलेले दिसत होते. “आपल्याला एका सभेला जायचे आहे असे मी तुला सांगितले होते. आपल्याला आता उशीर होणार आहे.” त्याच्या वडिलांना घाई झाली होती पण ते त्याला माफ करतील अशी बेनला खात्री वाटत होती.

“कसली तरी कंटाळवाणी सभा!” बेनच्या मनात विचार आला. खरे तर त्याला मुळीच जायचे नव्हते. पण ही सभा महत्त्वाची आहे असे त्याच्या बाबांनी सांगितले होते. आणि आता ते दोघे वॉशिंग्टन मधील सभेच्या ठिकाणी निघाले होते.



# प्रकरण ८



ते पेनसिल्व्हानिया अव्हेन्यूकडे जाऊ लागले तसे बेनचे डोळे विस्फारले. बापरे! गोरी आणि काळी, सगळी अमेरिकाच इथे जमलेली दिसत होती. त्यांच्या आजूबाजूला खूपच गर्दी होती. बेनने आपल्या वडिलांचा हात घट्ट पकडून ठेवला होता, नाहीतर चुकामुकच होईल.

एकाएकी काहीतरी संकेत झाल्याप्रमाणे सर्वत्र शांतता पसरली.



"बाबा, काय चालले आहे? मला दाखवा ना!"

बेनच्या वडिलांनी त्याला उचलून घेतले आणि एक गिरकी देऊन त्याला आपल्या खांद्यावर बसवले. बेनला आश्चर्याचा धक्काच बसला. तिथे हजारो लोक जमले होते. आतापर्यंत त्याने इतके लोक एकत्र कधीच पाहिले नव्हते. हे सगळे इथे का बरे आले असतील? त्याला विचार पडला.



सगळे लोक ज्या दिशेने पाहत होते, तिकडे त्यानेही मान वळवली. खरे आश्चर्य तर इथेच होते कारण गर्दीचे सर्व लक्ष एका काळ्या व्यक्तीवर खिळले होते. एका तासापूर्वी याच व्यक्तीने बेनची सहृदयपणे समजूत काढली होती.

मार्टिन ल्युथर किंग या बेनच्या मित्राने त्याच्या समोरच्या टेबलाच्या दोन्ही बाजू घट्ट पकडल्या आणि भाषणाला सुरुवात केली. सगळी गर्दी त्याचा प्रत्येक शब्द लक्षपूर्वक ऐकत होती.



“माझं एक स्वप्न आहे, की एक दिवस जॉर्जियातील लाल रंगाच्या टेकड्यांवर पूर्वीच्या गुलामांची मुले आणि त्यांचे पूर्वीचे मालक बंधुतेच्या भावनेतून एकत्र बसतील.





“माझं असंही स्वप्न आहे की माझी चार मुले अशा देशात राहतील की जेथे त्यांच्या त्वचेच्या रंगावरून नव्हे, तर त्यांच्यातील गुणांवरून, त्यांना ओळखले जाईल...

"... जिथे काळी आणि गोरी मुले हातात हात घालून बंधुतेने वाटचाल करतील.



आणि त्या दिवशी परमेश्वराची सर्व मुले खऱ्या अर्थाने 'लेट फ्रिडम रिंग!' हे गाणे गातील!



"जेव्हा प्रत्येक झोपडीत, प्रत्येक राज्यात आणि प्रत्येक शहरात असे स्वातंत्र्य नांदेल, तेव्हाच परमेश्वराची सर्व लेकरे - काळी आणि गोरी - हातात हात घालून एकत्रितपणे

"अखेर मी मुक्त आहे, मुक्त आहे

कृपानिधी परमेश्वरा

मी अखेर मुक्त आहे!"

हे निग्रोंचे भजन म्हणू शकतील असा दिवस दूर असणार नाही."





मार्टिन ल्युथर किंग यांनी आपले भाषण संपवले आणि बेनने आजूबाजूला पहिले. सर्व गर्दी भारावलेली होती. काहींच्या डोळ्यातून आसवे ओघळत होती.



“हे तेच आहेत! माझी आणि त्यांची ओळख आहे!” बेन आपल्या वडिलांना म्हणाला. घरी येताना बेनने मार्टिन ल्युथर किंग यांच्याबद्दल आणि त्यांची भेट कशी झाली हे सर्व आपल्या वडिलांना सांगितले. मार्टिन ल्युथर किंग यांच्यामुळे त्याचे आयुष्यच बदलून गेले.



# पुढे काय झाले?



मार्टिन ल्युथर किंग यांच्या वॉशिंग्टन मधील भाषणानंतर एक वर्षाने अमेरिकेचे अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी १९६४ साली 'नागरी हक्क कायदा' या नव्या कायद्यावर सही करण्याच्या प्रसंगी मार्टिन यांना व्हाईट हाऊस मध्ये (अमेरिकेच्या अध्यक्षांचे निवासस्थान व कार्यालय) येण्याचे आमंत्रण दिले. या कायद्याने अमेरिकेतील वंशभेदाची पद्धत बंद करण्यात आली. त्याच वर्षी मार्टिन यांना जगातील सर्वोच्च सन्मान - शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक - देण्यात आले. काळ्या लोकांसाठी त्यांनी अनेक लढे जिंकले. दुर्दैवाने, ४ एप्रिल १९६८ रोजी जेम्स अर्ल रे नावाच्या एका गोऱ्या इसमाने गोळी झाडून त्यांची हत्या केली. त्याला नंतर तुरुंगात टाकण्यात आले.



नागरी हक्कांची चळवळ मार्टिन यांच्या मृत्यूनंतरही चालू राहिली. १९६० नंतर अमेरिकेच्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये अनेक काळे लोक आपल्या शहराचे मेयर झाले आहेत. अनेक अमेरिकेच्या सरकारमध्ये लोकप्रतिनिधी आहेत. अनेक जण वकील, शिक्षक, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, बँकांमध्ये अधिकारी आहेत - पूर्वी अशी शक्यताच नव्हती. वंशभेद जरी बेकायदा ठरवण्यात आला असला, तरी तो अद्याप नाहीसा झालेला नाही. वंशभेदाबाबतचा विचार बदलण्यासाठी आणि काळ्या लोकांना चांगली वागणूक मिळावी यासाठी मार्टिन ल्युथर किंग यांनी विसाव्या शतकात सर्वाधिक योगदान दिले यात शंका नाही.

मार्टिन ल्युथर किंग (१९२९-१९६८)